23

# संस्कृत साहित्यिकांचा दारिद्र्यविषयक दृष्टिकोण

- **प्रा. अरुण चव्हाण**
संस्कृत विभाग प्रमुख
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,
परळी वैजनाथ जि.बीड

**प्रा**चीन काळी 'सोने की चिडिया' आणि 'विश्वगुरु' म्हणून मान्यता पावलेला भारतदेश आज 'भुकेला कोंडा अन् निजेला धोंडा' असे म्हणून दिवस कंठत आहे. खाद्य आणि कृषी संस्थेच्या (FAO च्या) अंदाजाप्रमाणे जगाच्या एकूण भूकेने पीडित लोकसंख्येच्या एक चतुर्थांश लोकसंख्या एकट्या भारतात आहे. आणि या भूकेचे मूळ कारण आहे दारिद्र्य. शेकडो वर्षांच्या गुलामगिरीने भारताचे वैभव लयाला गेले. असलेल्या थोड्याबहुत संपत्तीला भ्रष्टाचार आणि साठेबाजीचे ग्रहण लागले. भारत देशाच्या फार मोठ्या लोकसंख्येला दारिद्र्यरेषेखालचे जीणे वाट्याला आले. दारिद्र्याने पिचून गेलेल्या, गरीबीने खंगून गेलेल्या व्यक्तीकडून मग ज्ञान-विज्ञान व देशासाठी भरीव योगदानाची कशी अपेक्षा करणार ? दारिद्र्याची दहाकता माणसाला निरुत्साही बनवून नाशाकडे कशी घेवून जाते व त्याचबरोबर गरीबीचे भीषण वास्तव काय आहे, याचे समर्पक वर्णन संस्कृत साहित्यकारांनी केले आहे. हे वर्णन दारिद्र्याच्या प्रश्नाला सामोरे जाताना निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

दारिद्र्याने गांजलेल्या व्यक्तीची हळुहळु कशी दुर्गती होते, शेवटी त्याचा कसा नाश ओढवतो व दारिद्र्य कसे सर्व संकटांना आमंत्रण देणारे आहे याचे वर्णन पुढील श्लोकात आले आहे.

**दारिद्र्याद्ध्रियमेति ह्रीपरिगतः सत्वात्परिभ्रश्यते**
**निःसत्वः परिभूयते परिभवान्निर्वेदमापद्यते।**
**निर्विण्णः शुचमेति शोकानिहितो बुद्ध्या परित्यज्यते**
**निबुध्दिः क्षयमेत्यहो निर्धनता सर्वापदामास्पदम् ।।**[१]

म्हणजे दारिद्र्यामुळे मनुष्य लज्जित होऊ लागतो, लज्जित झालेला तो पराक्रमहीन बनतो, पराक्रमहीन झालेला त्याला दुसऱ्याकडून अपमानित व्हावे लागते, सततच्या अपमानामुळे त्याला दुःख होते, दुःखाने तो गरीब व्यक्ती शोकग्रस्त होतो, शोकाने ग्रासलेला तो बुध्दिहीन होतो आणि भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे (बुध्दिनाशात् प्रणश्यति।) बुध्दिचा नाश झाला म्हणजे व्यक्ती नष्ट होवून जातो अशा प्रकारे दारिद्र्य हे संकटांचे मूळ कारण आहे.

**अर्थमूलौ हि धर्मकामौ।**[२] या कौटिल्याच्या म्हणण्यानुसार धर्म, परोपकार आणि काम म्हणजे सर्व प्रकारच्या इच्छा यांची पूर्तता करण्यासाठी अर्थाची गरज आहे. संपत्ती असेल तरच समाजात व्यक्तीच्या गुणांना किंमत मिळते याचे वर्णन करताना महर्षी व्यास म्हणतात-

**यस्य अर्थाः तस्य मित्राणि, यस्य अर्थाः तस्य बान्धवाः।**
**यस्यार्थाः स पुमान् लोके, यस्यार्थाः स च पण्डितः।।**[३]

ज्याच्या जवळ संपत्ती आहे त्याला मित्र असतात, नातेवाईक त्याच्याशी जवळीक साधतात, त्यालाचा खरा (बहाद्दर) पुरुष म्हटले जाते आणि तोच खरा हुशार समजला जातो. हाच विचार मांडताना नीतिशतकामध्ये म्हटले आहे-

**यस्य अस्ति वित्तं स नरः कुलीनः स पण्डितः स श्रुतवान् गुणज्ञः।**
**स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः काञ्चनम् आश्रयन्ते।।**[४]

ज्याच्या जवळ पैसा आहे तोच मनुष्य घरंदाज समजला जातो, तोच पंडीत, तोच बहुश्रुत व तोच गुण जाणणाराही समजला जातो. त्यालाच उत्तम वक्ता मानले जाते, त्यालाच सुंदर समजले जाते अशा प्रकारे सर्व गुण सोन्याच्या म्हणजे संपत्तीच्या आश्रयाने राहतात. (या श्लोकातील शेवटची ओळ मराठीत वाक्प्रचार म्हणून रुढ झालेली आहे.)

याउलट संपत्ती नसणारा व्यक्ती क्षणभरात कसा; श्रीमंतासारखे सर्व गुण असूनही; वेगळाच होऊन जातो याचे उत्तम वर्णन पुढच्या श्लोकात आले आहे -

**तानीन्द्रियाण्यविकलानि तदेव नाम,**
**सा बुध्दिरप्रतिहता वचनं तदेव ।**
**अर्थोष्मणा विरहितः पुरुषः स एव,**
**अन्यः क्षणेन भवतीति विचित्रमेतत् ।।**[५]

'तीच विकार नसलेली इंन्द्रिये, नाव तेच, तल्लख बुध्दिमत्ता तशीच, बोलण्याची शैली तीच, पुरुषसुध्दा तसाच असूनही संपत्तीची उब नाहीशी झाली की क्षणर्धात व्यक्ती निराळाच होवून जातो हे विचित्रच आहे.' अशाप्रकारे श्रीमंत व्यक्तीकडे क्वचित योग्यता नसली तरीही त्याच्यातील (नसलेल्या) गुणांचे बखान केले जाते आणि गरीब व्यक्तींच्या अंगी असलेल्या गुणांची कदर केली जात नाही. अर्थातच **दारिद्र्यदोषो गुणराशिनाशी ।** (दारिद्र्य हा दोष गुणांच्या राशीलाही नष्ट करणारा आहे) या सामाजिक वास्तवाची प्रचीती संस्कृत साहित्यिकांनी करुन दिलेली दिसून येते.

मनुष्याच्या अपेक्षांना अंत नाही त्या वाढतच राहतात. पंचतंत्रात म्हटल्याप्रमाणे 'शताधीशाला सहस्राधीश व सहस्राधीशाला लक्षाधीश व्हावे वाटते. लक्षाधीशाला राज्य मिळवण्याची हाव सुटते तर राज्य मिळालेला राजा स्वर्ग मिळविण्याची इच्छा बाळगायला लागतो.'[६] हे जरी खरे असले तरी पोटभर जेवण, अंगभर कपडे आणि उन्हापावसापासून बचावासाठी साधे छप्पर याची इच्छा बाळगणे निश्चितच गैर नाही. या मूलभूत गरजा भागल्या शिवाय व्यक्ती दुसरे काही कार्य करण्याचा विचारच करु शकत नाही. समाजात स्थिरता, सौहार्द आणि सुख नांदायचे असेल तर आधी पोटाची खळगी भरलेली असणे आवश्यक आहे. आज भारताचे जे कोणते प्रश्न असतील त्या सर्वांच्या मुळाशी उदरभरणचिंता असलेली दिसून येईल. ही वस्तुस्थिती पंचतंत्रकारांनी फार पूर्वीच उत्तम रीतीने मांडली आहे ते म्हणतात, 'लाज, प्रेम, गोड बोलणे, बुध्दिवैभव, तारुण्य, विलास, प्रिय व्यक्तींची ओढ, दु:खनाश, धर्म, विद्या, गुरुजनांप्रती श्रध्दा, सदाचार, पवित्रता इत्यादी सर्व गुणांचा प्रादुर्भाव मनुष्याच्या मनात तेंव्हाच होतो जेव्हा त्याचे उदररुपी भांडे भरलेले असते.'[७] आम्हाला आज भारतात वेगवेगळी संशोधने व्हावीत, आमचा देश तंत्रज्ञान, सैन्यशक्ती इत्यादींनी जगात अव्वल असावा असे वाटते पण हे सर्व तेंव्हाच होवू शकते जेंव्हा सर्व प्रश्नांचे मूळ असलेल्या दारिद्र्याला आपण हद्दपार करु शकू.

अर्थव्यवस्था आणि समाज व्यवस्था जिथे पराभूत होते तिथेच दारिद्र्याचा जन्म होतो. म्हणूनच या परिषदेची समकालीन सार्थकता आहे. या परिषदेतील निष्कर्ष राष्ट्रासाठी उपादेय ठरावेत अशी अपेक्षा.

१. हितोपदेश (मित्रलाभ) श्लोक १३६
२. कौटिलीय अर्थशास्त्र प्र. ३ अ. ६
३. महाभारत पर्व १२ अ. ८
४. नीतिशतक श्लोक ३२
५. हितोपदेश (मित्रलाभ) श्लोक १२९
६. इच्छति शती सहस्रं सहस्री लक्षमीहते।
लक्षाधिपस्तथा राज्यं राज्यस्थः स्वर्गमीहते।। - पंचतंत्र-अपरीक्षितकारक श्लोक ७७
७. लज्जा स्नेहः स्वरमधुरता बुध्दयो यौवनश्रीः कान्तासङ्गः स्वजनममता दु:खहानिर्विलासः।
धर्मः शास्त्रं सुरगुरुमतिः शौचमाचारचिन्ता पूर्णे सर्वे जठरपिठरे प्राणिनां सम्भवन्ति।।पंचतंत्रअपरीक्षितकारक श्लोक ८९